Shri Vile Parle Kelavani Mandal's
DWARKADAS J. SANGHVI COLLEGE OF ENGINEERING
(Autonomous College Affiliated to the University of Mumbai)
NAAC Accredited with "A" Grade (CGPA : 3.18)

No. / SWD / Scholarship / 2026

02nd November, 2026.

NOTICE

F.E. AND DSE STUDENTS – ALL BRANCHES.

Reference: As per the Circular / Letter No. जा.क्र./ससंइमाबक/मुंउप/शिष्यवृत्तीअर्ज/एनएसपी पोर्टल/ २०२६-२७/६०७ dated 21.10.2026 issued by the concerned authority regarding scholarship applications on the NSP Portal for A.Y. 2026-2027.

All the students (F.E. and DSE) admitted through CAP/ ACAP and belonging to the OBC / SBC / VJNT categories, having an annual family income below ₹2,50,000/- for financial year 2025-26 are hereby informed that they are eligible to apply for the Scholarship for the Academic Year 2026-2027 on **National Scholarship Portal (NSP) Only.**

The eligible students are required to complete the online scholarship application form on the National Scholarship Portal (NSP) and upload all the necessary documents on **https://scholarship.gov.in**

The following scholarship schemes are available:

1. Post Matric Scholarship to OBC Students.
2. Post Matric Scholarship to SBC Students.
3. Post Matric Scholarship to VJNT Students.
4. Post Matric Scholarship to the Girls Belonging to Other Backward Classes taking admission in Professional Courses.

Students are required to submit the duly completed hard copy of the online application form along with the relevant necessary documents to the Scholarship Section of the college office (Counter No.5) on or before **30th November, 2026.**

Please Note:

1. Students taking admission in First Year / Direct Second Year (A.Y. 2026-2027) must submit their Fresh / New scholarship applications for the above-mentioned schemes only through the NSP.
2. The facility to submit Fresh applications for the above-mentioned schemes will not be available on the MahaDBT Portal 2.0.
3. It is the responsibility of all eligible students to complete the online application process and submit the hard copy along with the necessary documents within the prescribed deadline.
4. Online completion of form submission on NSP portal is the responsibility of eligible admitted students to avail OBC/SBC/VJNT benefit. Please read carefully, the guideline and rules of procedure for application submission on NSP.
5. If Freeship / Scholarship is not sanctioned from the concerned Government Authorities due to any reason, the student will have to pay the entire fees to the college as prescribed by the Fees Regulating Authority (FRA).

(Dr. Hari Vasudevan)
Principal

Cc.:
1. Notice Board and Website.
2. Concerned Departmental Notice Boards.
3. Registrar/ O.S.
4. Scholarship Section.

सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण,मुंबई उपनगर.

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई – ४०००७१.

दुरध्वनी क्र. ०२२-२५२२२०२३. ईमेल- advjntobcsbcmumsub@gmail.com

जा.क्र./ससंइमाबक/मुंउप/ शिष्यवृत्तीअर्ज/एनएसपी पोर्टल/२०२६-२७/६०७ दि- २१/१०/२०२६

प्रति,

प्राचार्य/अधिष्ठाता/संचालक,
महाविद्यालय सर्व,
मुंबई उपनगर

विषय- सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील PM YASHSVI Pre & Post Matric scholarship scheme for OBC,EBC & DNT या शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...

संदर्भ- १) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ५८७३ दि. १३/१०/२०२६
२) या कार्यालयाचे पत्र क्र. ३५५ दि. ०१/०७/२०२६
३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. शिवृत्ती-२०२३/प्र.क्र. ८३/शिक्षण मंत्रालय, मुंबई दि. २०/०६/२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील PM YASASVI POST MATRIC SCHOLARSHIP SCHEME FOR OBC, EBC AND DNT STUDENTS या शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना प्राप्त असल्याचे तसेच या योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये पुर्णांशाने **केवळ NSP PORTAL** वरती करावयाची असल्याच्या सुचना या कार्यालयास प्राप्त आहेत.

NSP PORTAL अंतर्गत येत असलेल्या शिष्यवृत्तीची यादी खालीलप्रमाणे-

१) इमाव (OBC) प्रवर्ग विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
२) विमाप्र (SBC) प्रवर्ग विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
३) विजाभज (VJNT) प्रवर्ग विद्यार्थी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
४) व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय (OBC) मुलींसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

वरील चार योजनांसाठी सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमास प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज (नवीन/फ्रेश अर्ज) केवळ एनएसपी पोर्टलवरच करण्यात यावेत. उपरोक्त योजनेसाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टल २.० वरती उपलब्ध असणार नाही याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

महाडीबीटी पोर्टल २.० वरती अर्ज सादर करावयाच्या योजना –

खालील सात योजनांचे अर्ज पुर्ववत महाडिबीटी पोर्टलवर भरण्यात यावेत.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती VJNT व SBC प्रवर्गातील इयता ११ वी व १२वी विद्यार्थी
२. व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे व व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहात राहणारे

VJNT व SBC विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

३. इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती योजना.

४. इमाव (OBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

५. विमाप्र (SBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

६. विजाभज (VJNT) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

७. व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची परतफेड OBC, VJNT व SBC, प्रवर्गातील विद्यार्थी (शासकीय किंवा खाजगी आयटीआय मध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी यांचे करिता)

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये यापुर्वी सर्व महाविद्यालये यांना या पोर्टलवरती नोंदणी करणेकरिता सुचित करण्यात आले असुन याबाबत सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. NATIONAL SCHOLARSHIP PORTAL (NSP) वर संस्थांची नोंदणी प्रक्रिया तात्काळ पुर्ण करावी. नोंदणी पुर्ण केलेनंतर अंतिम मान्यतेकरिता या कार्यालयाशी संपर्क साधावा. **नोंदणी प्रक्रिया सोबत जोडलेल्या प्रपत्रात दिली आहे.** तसेच सन २०२६-२७ वर्षाकरिता नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर अर्ज सादर करणेकरिता केंद्र शासनामार्फत खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

SCHEME OPEN FROM	STUDENT APPLICATION OPEN TILL	DEFECTIVE APPLICATION VERIFICATION OPEN TILL	INSTITUTE VERIFICATION OPEN TILL
१७.०७.२०२६	३०.११.२०२६	१५.१२.२०२६	१५.१२.२०२६

तरी सदर योजनेकरिता संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३०/११/२०२६** पर्यंत आहे. तरी उपरोक्त बाब आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन द्यावी तसेच नोटीस बोर्ड आणि महाविद्यालयाच्या सोशल मिडीया वरुन प्रसिद्ध करण्यात यावी. प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थी यांना महाडीबीटी २.० पोर्टल ऐवजी नॅशनल स्कॉलरशीप पोर्टल वरती आवेदन सादर करण्यास आपले स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

एकही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी खबरदारी घ्यावी. उपरोक्त नमुद केलेल्या सर्व प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार संबंधित महाविद्यालय राहील याची कृपया नोंद घ्यावी. **या योजनेसंबंधी कोणतीही अडचण उद्भवल्यास या कार्यालयातील श्रीम. ऐश्वर्या क्षीरसागर (शिष्यवृत्ती शाखा) मो. नं. ९८३४२९५८७९ यांना संपर्क करावा.**

सोबत : १. प्रपत्र अ आणि ब

२. एनएसपी पोर्टल माहितीपुस्तिका

(मयुरी कदम)
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण,
मुंबई उपनगर

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण मुंबई विभाग, मुंबई

प्रपत्र- अ

ज्या महाविद्यालयांनी अद्याप NSP PORTAL वर नोंदणी केलेली नाही, अशा संस्थांनी खालीलप्रमाणे INSTITUTE REGISTRATION करणे आवश्यक आहे:

१. HTTPS://SCHOLARSHIP.GOV.IN या संकेतस्थळास भेट द्यावी.
२. मुख्य पृष्ठावरील "INSTITUTE REGISTRATION" हा पर्याय निवडावा.
३. नोंदणी प्रक्रियेदरम्यान खालील माहिती नमूद करणे आवश्यक आहे:

- संस्थेचे संपूर्ण नाव
- AISHE CODE/UDISE CODE/INSTITUTE CODE
- राज्य व जिल्हा
- संस्थेचा संपूर्ण पत्ता
- संस्थेच्या प्रमुखांची माहिती (PRINCIPAL / HEAD OF INSTITUTION)
- अधिकृत ई-मेल आयडी
- अधिकृत मोबाईल क्रमांक

४. नोंदणी करताना संस्थेसाठी NODAL OFFICER नियुक्त करणे आवश्यक आहे.
५. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेला पोर्टलमार्फत USER ID व PASSWORD उपलब्ध होतील.
६. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर डिस्ट्रिक नोडल ऑफिसन / सहाय्यक संचालक संबंधित जिल्हा यांचेकडुन APPROVAL मिळाल्यानंतर संस्थेचा INSTITUTE PROFILE अद्यावत करून विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करणे आवश्यक राहील.

प्रपत्र- ब

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याची कार्यपद्धती

टप्पा १ — NSP पोर्टलला भेट देणे. HTTPS://SCHOLARSHIP.GOV.IN
विद्यार्थ्यांनी वरील अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन मुख्य पृष्ठावरील उपलब्ध पर्याय तपासावेत.

टप्पा २ — OTR नोंदणी करणे
नवीन विद्यार्थ्यांनी आवश्यकतेनुसार One Time Registration (OTR) प्रक्रिया पूर्ण करावी. त्यासाठी पोर्टलवर दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक माहिती भरावी व ओळख पडताळणी पूर्ण करावी.

टप्पा ३ — लॉगिन करणे
OTR क्रमांक व पोर्टलने निर्धारित केलेल्या लॉगिन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांनी लॉगिन करावे.

टप्पा ४ — शिष्यवृत्ती योजनेची निवड व अर्ज भरणे
विद्यार्थ्यांनी आपली पात्रता तपासून संबंधित शिष्यवृत्ती योजना निवडावी. त्यानंतर वैयक्तिक माहिती, शैक्षणिक तपशील, उत्पन्नाची माहिती, बँक खाते तपशील व आवश्यक कागदपत्रांची माहिती अचूक भरावी.

टप्पा ५ — अर्जाची पडताळणी व अंतिम सादरीकरण
भरलेली सर्व माहिती तपासून अर्ज अंतिमरीत्या सादर (Final Submit) करावा. अर्जाची पावती किंवा उपलब्ध अर्ज क्रमांक जतन करून ठेवावा.

टप्पा ६ — अर्जाची स्थिती तपासणे
अर्ज सादर केल्यानंतर पोर्टलवर उपलब्ध सुविधेनुसार अर्जाची स्थिती तपासावी. आवश्यकतेनुसार संस्था व संबंधित पडताळणी प्राधिकरणाकडून अर्जाची छाननी केली जाते.